**पोलीस अधिक्षक ,बिनतारी संदेश ,पुर्व विभाग ,नागपुर यांचे कार्यालय**
जुना काटोल नाका चौक ,काटोल रोड , नागपुर ४४००१३
फॅक्स आणि दुरध्वनी -०७१२-२५८०७०९
ई-मेल - : spweznagpur@gmail.com
*****

जा.क्र. ईई/ससाब-१९/ स्तंभकारागीर / 1315 /२०१९ नागपुर दिनांक:- ३१ /०५/२०१९

विषय:- स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांच्या वार्षिक सर्वसाधारण बदल्या - २०१९

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-याचे बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणारे विलंबास प्रतिबंध अधिनियम -२००५

२) मा. अपर पोलीस महासंचालक व संचालक ,पो.बि.सं. म.रा. पुणे यांचे पत्र क्रमांक:- ई. प्रलि-२/कर्मचारी/ससाबदल्या-२०१९/११५८ दिनांक: ०२/०३/२०१९

**आदेश**

संदर्भाधिन शासकीय अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार आणि सर्वसाधारण बदल्यासाठी गठीत करण्यात आलेल्या पोलीस आस्थापना मंडळांने केलेल्या शिफारसीनुसार खालील नमुद स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांच्या सर्वसाधारण बदल्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी/घटकात /उप-घटकात त्वरीत प्रभावाने करण्यात येत आहे.

**भाग - १**

**प्रशासकीय सोयीने बदल्या**

| अ. क्र. | स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांचे नाव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण/आस्थापणा | बदलीवरील नेमणुकीचे ठिकाण /आस्थापणा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री रणजीत बी. जाधवर | पोलीस अधिक्षक गडचिरोली | पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण | |

**भाग -२**

**विनंती बदली**

**निरंक**

## भाग ३

खालील नमुद स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांचे विनंतीचा सांगोपांग विचार करुन त्यांना त्यांचे विनंतीप्रमाणे सध्या कार्यरत असलेल्या ठिकाणीच येत आहे.

| अ क्र | स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांचे नाव | सध्या कार्यरत असलेले ठिकाण/आस्थापणा | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री किशोर प्रभुदास नंदनवार | अहेरी पोलीस अधिक्षक गडचिरोली | एक वर्ष मुदतवाढ |

२. ज्या स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांची विनंती वरुन बदली केलेली आहे.त्यांना बदली प्रवास भत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय नाही.

३. संबंधित घटक प्रमुखांनी उपरोक्त बदली झालेल्या स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांना बदलीवर सोडतांना पर्यायी /बदलीवर येणा-या स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांची वाट न पाहता बदलीवरील नेमणुकीच्या ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे.तसेच सदर स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांना बदलीवर कार्यमुक्त केल्याचा दिनांक तात्काळ या कार्यालयास निश्चीतपणे कळवावा

४. उपरोक्त आदेशान्वये स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांची बदली ज्या घटक कार्यालयात दर्शविण्यात आली आहे, तेथे सदर स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) हजर होण्याची जबाबदारी बदलुन गेलेल्या पोलीस घटक कार्यालयाची राहील .याची नोंद घ्यावी. त्यासाठी त्यांनी पाठपुरावा करावा. विहीत वेळेत हजर न होणा-या स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

५. संबंधित घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकातुन बदलुन येणारे जे स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) या आदेशानुसार बदलीवर नेमणुकीच्या ठिकाणी हजर होणार नाही. त्यांची नावे कृपया या कार्यालयास कळवावी.तसेच त्यांचा घटकातुन बदलुन जाणारे स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) बदलीवर हजर होण्याचे टाळून रुग्ननिवेदन करतील अशा स्तंभकारागीर (पोलीस हवालदार) यांनाही त्यांनी रुग्ननिवेदन केलेल्या दिनांकापासुन बदलीवर कार्यमुक्त केल्याचे (Deemed Relieved) दर्शविण्यात यावे व त्याबाबतचा अहवालदेखील या कार्यालयास सादर करावा.

(मा.अपर पोलीस महासंचालक व संचालक पो.बि.सं.पुणे यांचे मान्यतेने )

(ई.दा.कांबळे)
पोलीस अधिक्षक
बिनतारी संदेश पुर्व विभाग
नागपुर

प्रति,
पोलीस अधिक्षक गडचिरोली, नागपुर ग्रामीण
प्रत सविनय सादर
मा. अपर पोलीस महासंचालक व संचालक ,पो.बि.सं. म.रा. पुणे
प्रत,

अपर पोलीस अधिक्षक अहेरी
पोलीस उप-अधिक्षक बिनतारी संदेश नागपुर
पोलीस निरीक्षक बिनतारी संदेश अहेरी, गडचिरोली, नागपुर ग्रामीण

/ /

/ /

/ /

/ /